नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २३६ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026



रविवार, दि. ०९ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्राला 'अंब्रेला' संस्थेमुळे नवसंजीवनी

मुंबई : (स. गांवकरी)

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्राला आधुनिक, पारदर्शक, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानाधिष्ठित बनविण्यासाठी 'अंब्रेला ऑर्गनायझेशन' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या माध्यमातून देशातील प्रत्येक तहसीलपर्यंत अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंगचे जाळे विस्तारण्याला मोठी चालना मिळेल, असा विश्वास केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी आज व्यक्त केला. देशातील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत त्यांनी राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे मुख्यालय दिल्लीहून महाराष्ट्रात हलवण्यात येईल, अशी घोषणा केली. बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे आयोजित 'सहकार नव-क्रांती मेळावा' कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पणन मंत्री जयकुमार रावल, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त विकास महामंडळाचे अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता, केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशीष कुमार भूटानी तसेच अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. केंद्रीय मंत्री शहा म्हणाले की, देशातील प्रत्येक अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने, अगदी एका शाखेच्या बँकेनेही अंब्रेला ऑर्गनायझेशनचे सदस्यत्व घ्यावे. सदस्यत्व घेतल्यानंतर सुरक्षा संचालन केंद्राशी (सिक्युरिटी ऑपरेशन सेंटरशी) जोडले जावे. यामुळे बँकांमधील ठेवीदारांचा विश्वास वाढण्यास मदत होईल आणि बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित होईल. अंब्रेला संस्था बँकिंग क्षेत्रात करण्यात येत असलेल्या नवीनतम सुधारणांची माहिती तसेच म्यूल हंटरसारख्या अनेक आवश्यक सॉफ्टवेअर सुविधा देखील या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातील. अंब्रेला संस्थेच्या मदतीने कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित करता येतील, जे कर्मचाऱ्यांसाठी अत्यावश्यक ठरणार आहे. स्पर्धात्मक बँकिंग क्षेत्रात इतरांच्या बरोबरीने उभे राहण्यासाठी तसेच जनता आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा विश्वास संपादन करण्यासाठी अंब्रेला संस्था मार्गदर्शक ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशातील सुमारे १,४०० अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांमध्ये सुमारे सहा लाख कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. देशाच्या आर्थिक विकासात या बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. छोटे दुकानदार, व्यापारी, कुटीर उद्योग, एमएसएमई, स्थानिक व्यावसायिक, महिला बचत गट तसेच मध्यमवर्गीयांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी छोट्या कर्जांची आवश्यकता असते.



- केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह
- 'राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळा'चे मुख्यालय महाराष्ट्रात होणार

'मेघालय भवन' विकास, संस्कृती आणि एकात्मतेचा संगम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत जमीन हस्तांतरण व भूमिपूजन सोहळा

नवी मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्र आणि ईशान्य भारतातील मेघालय ही केवळ दोन राज्ये नसून 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेला मूर्त रूप देणारी सहोदर राज्ये आहेत, महाराष्ट्र आणि मेघालय यांच्यातील सांस्कृतिक व आर्थिक नाते अधिक दृढ होत असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. खारघर येथील प्लॉट नंबर १४, सेक्टर १६ येथे आयोजित 'मेघालय सदन' च्या जमीन हस्तांतरण व भूमिपूजन सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. नवी मुंबई, ठाणे आणि रायगड हा संपूर्ण परिसर देशाच्या भविष्यातील अर्थव्यवस्थेला मोठी गती देणार असून, हाच परिसर भारताच्या विकासाचे पुढील मुख्य केंद्र ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा, मेघालयचे उपमुख्यमंत्री प्रेस्टोन टिनसोंग, मेघालयचे सामान्य प्रशासन विभाग मंत्री सोस्थेनिस सोहतुन यांच्यासह खासदार मिलिंद देवरा, आमदार मंदा म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, मेघालयचे मुख्य सचिव शकील अहमद, मेघालयच्या सामान्य प्रशासन विभागाचे आयुक्त व सचिव सिरिल व्ही. डी. डिएंगडोह, पनवेलचे महापौर नितीन पाटील, कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सिडकोचे मुख्य महाव्यवस्थापक अश्विन मुद्गल, सिडकोचे सहव्यवस्थापक राजा दयानिधी, सिडकोचे सहव्यवस्थापक गणेश देशमुख, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, पनवेल प्रांताधिकारी पवन चांडक, तहसिलदार मिनल भामरे तसेच मेघालयातील महाराष्ट्रात वास्तव्यास असणारे विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र आणि मेघालयच्या राज्यगीताने या सोहळ्याचा प्रारंभ झाला. मेघालयातील जगप्रसिद्ध पारंपारिक नृत्य शैलीत मेघालयीन कलाकारांनी सादरीकरण केले. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मेघालयाचे मुख्यमंत्री कॉनराड के.संगमा यांच्याकडे मेघालय भवनसाठीच्या जमिनीची कागदपत्रे हस्तांतरित करण्यात आली.



यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी दोन्ही राज्यांमधील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अनुबंधांवर प्रकाश टाकला. ईशान्य भारतातील विद्यार्थी, कलाकार आणि संगीत क्षेत्रातील दिग्गजांसाठी मुंबई व पुणे ही अत्यंत पसंतीची ठिकाणे आहेत. विशेषतः मेघालयच्या आत्म्यात वसलेल्या संगीताचा मुंबईच्या संगीत जगताशी अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे. त्यामुळेच खारघरसारख्या मोक्याच्या ठिकाणी आकारास येणारे हे मेघालय भवन केवळ एक इमारत नसून, मेघालयातून शिक्षणासाठी, वैद्यकीय उपचारांसाठी किंवा कला सादरीकरणासाठी येणाऱ्या नागरीक व विद्यार्थ्यांसाठी हक्काचे घर ठरेल. नवी मुंबई परिसराच्या होत असलेल्या अभूतपूर्व विकासाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या भागात जागतिक दर्जाच्या १२ अव्वल विद्यापीठांचा समावेश असणारी 'एज्यु-सिटी' आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची 'मेडी-सिटी' उभारली जात आहे. सोबतच देशातील ६० टक्के डेटा सेंटर क्षमता याच परिसरात निर्माण होत असून, हे क्षेत्र न्यू-एज आणि डीप-टेक उद्योगांचे केंद्र बनत आहे. पुढील १० ते १५ वर्षांत जेव्हा मेघालयचे नागरिक या वास्तूचा वापर करतील, तेव्हा या नियोजित आणि भविष्याभिमुख जागेचे महत्त्व त्यांना अधिक स्पष्टपणे जाणवेल. मेघालय भवनचे बांधकाम लवकरात लवकर आणि उत्कृष्ट दर्जाचे पूर्ण करण्यासाठी सिडको किंवा राज्य सरकारच्या यंत्रणांमार्फत सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

नवी मुंबईतील मोक्याच्या ठिकाणी 'मेघालय भवन'साठी जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सिडको आणि स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांचे विशेष आभार मानले. मुंबईत उपचारासाठी येणारे रुग्ण, विद्यार्थी आणि व्यावसायिकांची वाढती संख्या पाहता जुन्या मेघालय भवनमध्ये जागेची मोठी अडचण भासत होती. नीती आयोगाच्या बैठकीत संगमा यांनी विनंती करताच अवघ्या काही सेकंदांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जमिनीचा प्रस्ताव मान्य केला. या उपक्रमाला त्यांनी पूर्व आणि पश्चिम भारताला जोडणारा आणि देशाच्या एकात्मतेला अधिक बळ देणारा एक ऐतिहासिक टप्पा मानला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळेच ईशान्य भारतातील राज्ये आज देशात सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक बनली असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रासोबतचे जुने संबंध आठवत संगमा यांनी आगामी काळात व्यापार, कृषी आणि संस्कृतीच्या क्षेत्रात भागीदारी अधिक मजबूत करण्याचा विश्वास व्यक्त केला. विशेषतः मेघालयची जगप्रसिद्ध 'लाखडोंग हळद', क्रीडा क्षेत्र आणि तेथील समृद्ध संगीत परंपरा मुंबई व महाराष्ट्राच्या माध्यमातून जगभरात पोहोचवण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

> मुख्यमंत्री फडणवीस यांनी मेघालयचे माजी मुख्यमंत्री व लोकसभेचे माजी अध्यक्ष दिवंगत पी. ए. संगमा यांच्या संसदेतील अतुलनीय योगदानाचे भावूक स्मरण केले. अत्यंत खडतर राजकीय परिस्थितीतही चेहऱ्यावर हास्य ठेवून त्यांनी देशाची संसद कुशलतेने चालवली. त्यांचाच वारसा पुढे नेत मेघालयचे तरुण व गतिमान मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा यांनी गेल्या ६ ते ७ वर्षांत मेघालयची अर्थव्यवस्था दुप्पट केली आहे, अशा शब्दांत त्यांनी त्यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. केवळ या भवनापुरते मर्यादित न राहता, येत्या काळात महाराष्ट्र आणि मेघालय हे दोन्ही राज्ये संस्कृती आणि अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत परस्पर सहकार्याने अधिक वेगाने पुढे जातील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

दिल्ली मराठी चित्रपट महोत्सवात प्रेक्षकांशी संवाद

समृद्ध मराठी चित्रपटांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या संस्कृतीला जागतिक व्यासपीठ - मंत्री उदय सामंत

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

मराठी चित्रपटांनी महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून देशभरात आणि जागतिक स्तरावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. दिग्दर्शक, निर्माते, कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्या अथक परिश्रमामुळे मराठी चित्रपट आज जागतिक व्यासपीठावर पोहोचला असून, मराठी भाषा आणि संस्कृतीचा झेंडा देशाच्या राजधानीतही दिमाखाने फडकत आहे, असे गौरवोद्गार मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज येथे काढले.

दिल्ली मराठी प्रतिष्ठानतर्फे महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने आयोजित 'दिल्ली मराठी चित्रपट महोत्सवा'ला भेट देऊन प्रेक्षकांशी त्यांनी संवाद साधला. या भव्य महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी झाले.

यावेळी महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त श्वेता सिंघल, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल यांच्यासह 'देऊळ बंद २' चे दिग्दर्शक प्रवीण तरडे, सत्यशोधक चित्रपटाचे दिग्दर्शक निलेश जळमकर यांची विशेष उपस्थिती होती.



या दोन्ही दिग्दर्शकांनीही प्रेक्षकांशी संवाद साधला. दिल्लीत मराठी चित्रपटांना मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून समाधान व्यक्त करताना मंत्री सामंत यांनी महाराष्ट्राची समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरा दिल्लीकरांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. दिल्लीत भव्य स्वरूपात गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात यावे, अशी सूचना करून ते म्हणाले, या उत्सवाच्या माध्यमातून दिल्लीतील नागरिकांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे अधिक व्यापक आणि प्रत्यक्ष दर्शन घडेल, तसेच महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठसा राजधानीत अधिक ठळकपणे उमटेल.

मराठी चित्रपट केवळ मुंबई आणि पुण्यापुरता मर्यादित न ठेवता देशातील विविध भागांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे. विशेषतः तंजावर आणि बडोदा यांसारख्या मराठी संस्कृतीशी ऐतिहासिक नाते असलेल्या शहरांमध्येही मराठी चित्रपट महोत्सव आयोजित करण्यावर भर देण्यात यावा, असे त्यांनी सुचवले.





जागतिक आदिवासी दिन : संस्कृती, संघर्ष आणि निसर्गाशी नाते जपणाऱ्या मूळ समूहाचा इतिहास

निसर्गाच्या कुशीत, डोंगर-दऱ्यांमध्ये आणि अथांग जंगलांमध्ये शतकानुशतके निवास करणारा समाज म्हणजे 'आदिवासी'. आदिवासी म्हणजे या भूमीचे मूळ रहिवासी, ज्यांनी निसर्गाशी एकरुप होऊन आपले जीवन जगले आहे आणि पृथ्वीचे संतुलन राखण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस जगभरात 'जागतिक आदिवासी दिन' (International Day of the World's Indigenous Peoples) म्हणून मोठ्या उत्साहाने आणि अभिमानाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ उत्सव साजरा करण्याचा नाही, तर आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, त्यांचे निसर्गाशी असणारे अनोखे नाते, त्यांचा ऐतिहासिक लढा, त्यांच्या आजच्या समस्या आणि भविष्यातील आव्हाने यांवर सखोल चिंतन करण्याचा आणि त्यांच्या हक्कांचा पुनरुच्चार करण्याचा दिवस आहे.



शब्दांकन : डॉ. विश्वासराव आरोटे, कळसुबाई शिखरावरून

(स. गांवकरी)

संयुक्त राष्ट्रसंघाने (United Nations) १९९४ मध्ये ९ ऑगस्ट हा दिवस 'जागतिक आदिवासी दिन' म्हणून घोषित केला. ९ ऑगस्ट १९८२ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार आयोगांतर्गत 'आदिवासी लोकसंख्येवरील कार्यगट' (Working Group on In d igenous Populations) यांची पहिली बैठक पार पडली होती. या बैठकीचे औचित्य साधून आणि जगातील मूळ रहिवाशांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने ९ ऑगस्ट हा दिवस दरवर्षी जागतिक आदिवासी दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला. पुढे १३ सप्टेंबर २००७ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने 'आदिवासींच्या हक्कांचा जाहीरनामा' (UN Declaration on the Rights of Indigenous Peoples - UNDRIP) मंजूर केला, ज्यामध्ये आदिवासींच्या जल, जंगल, जमीन, संस्कृती, भाषा आणि स्वयंनिर्णयाच्या हक्कांना आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता देण्यात आली. जगातील सुमारे ९० हून अधिक देशांमध्ये ४७ कोटींपेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या राहते, जी जागतिक लोकसंख्येच्या सुमारे ६% आहे. परंतु, गरिबी, जल-जंगल-जमिनीचा ऱ्हास आणि विकासाच्या नावाखाली होणारे विस्थापन यामुळे हा समाज सातत्याने विविध आव्हानांना तोंड देत आहे.

आदिवासी संस्कृती ही जगातील सर्वात प्राचीन आणि समृद्ध संस्कृतींपैकी एक आहे, जिचा मुख्य गाभा 'निसर्गपूजा' हा आहे . आदिवासी समाज निसर्गाला 'आई ' मानतो. झाडे, नद्या, डोंगर, प्राणी आणि पक्षी हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. आज संपूर्ण जग हवामान बदल (Climate Change) आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाशी लढत असताना आदिवासींनी शतकानुशतके निसर्गाचे शोषण न करता त्यासोबत कसे जगायचे, याचे आदर्श उदाहरण घालून दिले आहे. आदिवासी केवळ आवश्यक तेवढ्याच निसर्गसंपत्तीचा वापर करतात आणि तिचा पुनर्संचय होण्यासाठी निसर्गाला वेळ देतात. त्यांच्या संस्कृतीत संगीत, कला आणि नृत्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाराष्ट्रातील तारपा नृत्य, वारली नृत्य, रेला नृत्य, आणि गावीत किंवा भिल्ल समाजाची पारंपरिक नृत्ये ही निसर्गाच्या तालावर आधारित असतात. वारली चित्रकला (Warli Art) तर जगभरात प्रसिद्ध आहे, ज्यामध्ये तांदळाचे पीठ आणि लाल माती वापरून वर्तुळ, त्रिकोण आणि रेषीय आकारांतून जीवन व निसर्गाचे नाते रेखाटले जाते. यासोबतच आदिवासींकडे जडीबुटी आणि वनस्पतींचे अथांग मौखिक ज्ञान आहे; जंगलातील कोणत्या वनस्पतीचा वापर कोणत्या आजारावर करावा, याचे पारंपरिक ज्ञान पिढ्यानपिढ्या हस्तांतरित होत आले असून आधुनिक वैद्यकशास्त्रासाठी हे ज्ञान अनेकदा मार्गदर्शक ठरले आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी समाजाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. ब्रिटिशांनी जेव्हा भारताच्या जंगलांवर ताबा मिळवण्यास आणि आदिवासींच्या जमिनी बळकावण्यास सुरुवात केली, तेव्हा सर्वात पहिला प्रतिकार आदिवासींनीच केला. छोटानागपूर (आजचे झारखंड) भागातील भगवान बिरसा मुंडा यांनी ब्रिटिशांच्या शोषणाविरोधात आणि जमीनदारांच्या अत्याचाराविरोधात 'उलगुलान' (मोठे बंड) पुकारले आणि आपल्या समाजाला स्वाभिमानाने जगण्याचा संदेश दिला, ज्यामुळे आजही त्यांना 'धरती आबा' म्हणून पूजले जाते. महाराष्ट्रातही क्रांतीवीर नाग्या कातकरी, राघोजी भांगरे, खाज्या नाईक, तंट्या भिल्ल (ज्यांना 'आदिवासींचे रॉबिनहूड' म्हटले जाते) आणि गोंडवाना भागातील बाबाराव मडावी यांसारख्या वीरांनी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र लढा दिला. याव्यतिरिक्त सिद्धू-कान्हू, अल्लुरी सीताराम राजू आणि राणी गाईदिनल्यू अशा अनेक आदिवासी नायकांनी स्वातंत्र्यासाठी प्राणांचे बलिदान दिले.

महाराष्ट्रात आदिवासींची लोकसंख्या उल्लेखनीय असून राज्य शासनाने ४७ आदिवासी जमातींना अनुसूचित जमाती (ST) म्हणून अधिसूचित केले आहे. भिल्ल, गोंड, महादेव कोळी, वारली, कातकरी, ठाकूर, कोरकू, माडिया गोंड आणि आंध या राज्यातील प्रमुख जमाती आहेत. यांपैकी कातकरी, माडिया गोंड आणि कोलाम या जमातींना विशेष अतिसंवेदनशील किंवा संकटग्रस्त आदिवासी गट (PVTG) म्हणून घोषित करण्यात आले आहे. नाशिक, पालघर, ठाणे, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, अमरावती (मेळघाट), चंद्रपूर आणि गडचिरोली हे महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी बहुल जिल्हे आहेत, जिथे प्रत्येक जमातीची स्वतःची बोलीभाषा, सण, परंपरा आणि खाद्यसंस्कृती पाहायला मिळते.

आजचा आदिवासी समाज एका बाजूला आधुनिक जगाशी जोडला जात असला, तरी दुसऱ्या बाजूला अनेक गंभीर समस्यांचा सामना करत आहे. खाणकाम, मोठे धरण प्रकल्प, उद्योग आणि अभयारण्यांच्या नावाखाली होणाऱ्या विस्थापनामुळे आदिवासी आपली ओळख, संस्कृती आणि उपजीविकेचे साधन गमावून बसत आहेत. महाराष्ट्रातील मेळघाट, पालघर आणि गडचिरोली यांसारख्या दुर्गम भागांत बालकुपोषण आणि माता मृत्यूचे प्रमाण अजूनही चिंताजनक आहे. दुर्गम भागात शाळांची दुरवस्था आणि स्थानिक बोलीभाषेतून शिक्षणाची सोय नसल्यामुळे मुलांमध्ये शाळा सोडण्याचे प्रमाण जास्त आहे, ज्यामुळे त्यांना चांगल्या रोजगाराच्या संधी मिळत नाहीत. तसेच, आधुनिकतेच्या प्रवाहात गोंडी, भिल्ली, कोरकू, पावरा यांसारख्या अनेक आदिवासी बोलीभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, कारण त्यांना लिखित लिपी नसल्याने ही मौखिक परंपरा टिकवणे कठीण जात आहे.

या समस्यांवर मात करण्यासाठी भारतीय संविधानाने आणि शासनाने काही विशेष तरतुदी व कायदे केले आहेत. संविधानाच्या पाचव्या आणि सहाव्या अनुसूचीद्वारे आदिवासी क्षेत्रांना संरक्षण देण्यात आले आहे. पेसा कायदा (PESA Act, 1996) द्वारे ग्रामसभांना जल, जंगल आणि जमिनीवर निर्णय घेण्याचे सर्वोच्च अधिकार मिळाले आहेत. तसेच वनहक्क कायदा (Forest Rights Act, 2006) द्वारे शतकानुशतके जंगलात राहणाऱ्या आदिवासींना त्यांच्या वैयक्तिक आणि सामूहिक वनजमिनींवर कायदेशीर हक्क दिले गेले आहेत. शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये अनुसूचित जमातींसाठी आरक्षणाची सोयही करण्यात आली आहे.

जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून या कायद्यांची आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. वनहक्क कायद्यांतर्गत जमिनींचे पट्टे वाटप वेगाने होणे, प्राथमिक शिक्षण मुलांच्या मातृबोलीत उपलब्ध करून देणे, दुर्गम भागातील आरोग्य सुविधा सक्षम करून कुपोषण पूर्णपणे थांबवणे आणि आदिवासींच्या पारंपरिक ज्ञानाचे व हस्तकलेचे दस्तऐवजीकरण करून त्यांना योग्य बाजारपेठ मिळवून देणे अत्यंत आवश्यक आहे.

शेवटी, आदिवासी समाज हा केवळ आपल्या भूतकाळाचा भाग नसून आपल्या शाश्वत भविष्याचा पाया आहे. निसर्गाशी कृतज्ञ राहून कसे जगायचे, हे आदिवासी संस्कृती आपल्याला शिकवते. आदिवासी बांधव हे सहानुभूतीचे पात्र नसून या भूमीचे खरे मालक आणि निसर्गाचे रक्षक आहेत. त्यांच्या स्वाभिमानाचे, संस्कृतीचे आणि घटनात्मक हक्कांचे जतन करणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. चला तर मग, या जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने आदिवासी संस्कृतीचा अभिमान बाळगूया आणि त्यांच्या संघर्षात खंबीरपणे सोबत उभे राहूया. जय सेवा! जय जोहार!

महाराष्ट्र राज्य पत्रकार व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघामुळे ग्रामीण पत्रकारितेला नवी उंची

(स. गांवकरी)

चांदा ते बांदा पत्रकारांची वज्रमोट... गोवा दिल्ली बेळगाव गुजरात मध्य प्रदेश कर्नाटक राज्यात संघाचा विस्तार सुखात नव्हे तर दुखात उभा राहणारा ग्रामीण पत्रकारांचा एक संघ एक वचनी एक बाणा.... पत्रकारांच्या मागण्यांसाठी दीक्षाभूमी ते मंत्रालय संवाद यात्रा. लाडकी बहीण लाडका भाऊ आता लाडका पत्रकार योजना सुरू करा पत्रकार संघाची राज्य सरकारकडे मागणी.....



■ शब्दांकन : दशरथ चव्हाण.. नवी मुंबई विभागीय संपादक दैनिक गांवकरी../ शांताराम मगर संभाजीनगर

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून पत्रकार संघाच्या माध्यमातुन ग्रामीण पत्रकारितेला संघटित बळ, प्रशिक्षण आणि नवी दिशा मिळत आहे. गावागावातील प्रश्न, शेतकरी,कामगार, विद्यार्थी, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्रभावीपणे मांडण्याचे काम ग्रामीण पत्रकार करीत आहेत. ग्रामीण भागातील पत्रकारांना विविध विषयांवर मार्गदर्शन,कार्यशाळा,पत्रकारिता प्रशिक्षण आणि आवश्यक व्यासपीठ उपलब्ध करून देत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने ग्रामीण पत्रकारितेचा दर्जा उंचावण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. 27000 सभासद असणारी राज्यातील तदागाळापर्यंत संपादक ते थेट वर्तमानपत्र इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रिंट मीडिया युट्युब या सर्वांना वेळेला साथ देणारी सुखात दुःखात मदतीचा हात या पलीकडे जाऊन पत्रकार हा समाजाला देणारा पत्रकार आहे घेणारा नाही वर्षातील 365 दिवसांपैकी 265 दिवस विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न त्याचबरोबर जनतेला व सर्वसामान्य जनतेला विद्यार्थ्यांना पायी दिंडी वारी वारकरी यापासून सर्वांनाच थेट मदत देणारा हीच ओळख निर्माण केली दिपवाली सणात पत्रकारांच्या घरी गोडवा निर्माण व्हावा यासाठी दीपोत्सव तर गुणवंत विद्यार्थ्यांसाठी वह्या दप्तरे व गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा घेऊन पत्रकारांवर अन्याय झाला तर जशास तसे उत्तर देण्यासाठी एक वज्रमठ बांधून ठेवली या संघटनेची बुलंद तोफ संजय भोकरे यांच्या खंबीर साथीने व मदतीने व प्रदेश अध्यक्ष निलेश सोमानी यांच्या कार्यकर्तृत्वामुळे या संघटनेचा विस्तार आजही पुढे जात आहे.

शहरांपुरती मर्यादित न राहता गावखेड्यातील वास्तव परिस्थिती समाज आणि प्रशासनासमोर आणणे, अन्यायाला वाचा फोडणे आणि विकासकामांवर निर्भीडपणे प्रकाश टाकणे, ही ग्रामीण पत्रकारितेची खरी ताकद आहे.

ग्रामीण पत्रकार हा लोकशाहीचा गावपातळीवरील पहारेकरी आहे. त्याच्या लेखणीला संघटनेचे बळ मिळाले, तर ग्रामीण भागातील प्रश्न अधिक प्रभावीपणे शासनाच्या दरबारात पोहोचु शकतात.

महाराष्ट्र पत्रकार संघाच्या माध्यमातुन ग्रामीण पत्रकारिता सक्षम, संघटित आणि उच्च दर्जाची करण्याचा संकल्प ही काळाची गरज आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू असलेली पत्रकारिता आता वेगळ्या रंग-ढंगात मार्गक्रमन करत आहे. या दरम्यान पत्रकारितेत झालेला बदल कमालीचा असून ग्रामीण पत्रकारीतेचे पाऊल आंतरराष्ट्रीय दर्जाकडे पडत आहेत.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांच्या विविध विषयांवर झालेल्या कार्यशाळेच्या आधिवेशनाच्या माध्यमातून शहरी पत्रकारितेसह ग्रामीण पत्रकारिता आता आंतरराष्ट्रीय दर्जाची होत आहे, डिजिटल,अत्याधुनिक साहित्य व योग्य व्यासपीठ मिळत असल्याने गाव, तालुका, जिल्हा , राज्य किंबहुना देश पार करून ग्रामीण पत्रकारिता परदेशात आपला डंका वाजवत आहे, याला अत्याधुनिक सोशल मीडियाचा भक्कम आधार ही मोठी उपलब्धी आहे. महाराष्ट्राला ध्येयवादी,निर्भीड पत्रकारितेची गौरवशाली परंपरा आहे, ही परंपरा पुढे घेऊन जात, शब्दांना सत्याची धार देत राज्यातील मराठी वृत्तपत्रसृष्टीत स्वतंत्र स्थान निर्माण करत पत्रकारिता बहरत राहीली आहे, यातील लेखनातून जिल्ह्याच्या, राज्याच्या राजकीय, सामाजिक चळवळीला,समाजाच्या सर्वसमावेशक विकासाला नक्कीच नवी दिशा मिळत गेली आहे. मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्यापासून सुरू झालेली मराठी पत्रकारिता ही नेहमीच ध्येयवादी राहिली आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात देशाची पारतंत्र्यातून मुक्ती हे मुख्य ध्येय होते. नंतरच्या काळात लोकप्रबोधन, अनिष्ठ रूढी-परंपरांचे उच्चाटन,समाजाच्या सर्वांगीण विकासाला गती, यासारखी अनेकविध उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेवून मराठी पत्रकारिता पुढे जात राहिली. मराठी पत्रकारितेत आपले स्थान निर्माण करत असताना, राज्यातील प्रत्येक वृत्तपत्राने आपली वैचारिक बांधिलकी जपण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला. ही वैचारिक बांधिलकी त्या त्या वृत्तपत्राची ओळख बनली, काळानुसार पत्रकारिता हायटेक होत राहिली अन डिजिटल तंत्रज्ञानाचा साहाय्याने गावकुसातील अपडेट तात्काळ दर्शकापर्यंत पोहचायला लागली. केवळ वृत्तपत्र नाही तर न्यूज चॅनल, यु ट्यूब चॅनल, वेब न्यूज,न्यूज पोर्टल, या माध्यमातून अपडेटची दर्शक-वाचकांना सवय लागली , तात्काळ अपडेट देणाऱ्या पत्रकारितेमुळे दर्शकांची भूक भागू लागली. ग्रामीण भागातील पत्रकारिता पहिले केवळ एका चौकटीत बंदिस्त होती,गाव व खेड्यातील प्रश्न , समस्या ह्या छापून यायच्या व त्याला देखील "ग्रामीण" मध्येच स्थान असायचे. कित्येक वृत्तपत्रांनी शहर वेगळे व ग्रामीण वेगळे असे प्रयोग देखील केलेले आहे, आता मात्र ह्या ग्रामीण पत्रकारितेने कात टाकली असून ,परदेशात बघितल्या जाणाऱ्या बातम्या आता ग्रामीण भागातून येत असल्याचा सार्थ अभिमान वाटतो. भारत हा कृषीप्रधान देश असल्याचा गवगवा होतो मात्र या देशातील बळीराजा जे नवीन शोध, प्रयोग, व उपक्रम राबवतो हे या आधी म्हणावे तसे दाखवले गेले नाही, आता मात्र डिजिटल युगात माझा बळीराजा काय करतोय हे परदेशात देखील अगदी सचित्र बघता येते. ग्रामीण भागात असलेल्या हरहुन्नरी कलाकारांना आता स्थान मिळू लागले आहे, कला, क्रीडा, साहित्य, नवनवीन शोध आदी गोष्टीला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. पहिले केवळ शहरी पत्रकारिता लक्ष असलेल्या प्रस्थापित माध्यमांनी देखील आता ग्रामीण भागातील घडणाऱ्या प्रत्येक बातमीवर करडी नजर ठेवायला सुरुवात केली अन त्यांना देखील टीआरपी मिळू लागला. अलीकडच्या काळात पत्रकारितेचे शिक्षण देणारे केंद्र सुरू झाल्याने पत्रकारिता आधिकच गतिमान झाली, यात शोध पत्रकारिता व नाविन्यपूर्ण वार्ता संकलन सुरू झाल्याने काही वेळातच मिलियन मध्ये विव्हर्स मिळायला लागले. ग्रामीण मधील अगदी छोट्या, साध्या घटना घडामोडीचा सर्व कंगोऱ्याचा अभ्यास आता होऊ लागला आहे. एकंदरीतच ग्रामीण पत्रकारिता आता व्यापक स्वरूप प्राप्त करत आहे.

ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंत संघटनेत काम करणाऱ्या पत्रकारांना शासनाच्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न सुरु आहेत. पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे. यासाठी राज्य मराठी पत्रकार संघाचे आश्वासक लढवय्ये प्रेरणादाई नेतृत्व पै. संजय भोकरे, सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे साहेब सिध्दार्थ भोकरे मार्गदर्शनानुसार प्रदेश अध्यक्ष निलेश सोमानी .नवनाथ जाधव वैभव स्वामी,,आनिल सावंत छबुराव ताके यांच्या नियोजनुसार मराठवाड्यातील आणि राज्यातील पत्रकारांच्यां सहकार्याने आधिवेशनाला विविध पक्ष सामाजिक संघटनांचा पाठिंबा मिळत आहेत.



अकोलेत जागतिक आदिवासी दिनाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित राहणार



डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

भव्य मिरवणूक व जाहीर सभेची जय्यत तयारी : मारुती मेंगाळ!

९ ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक आदिवासी दिनानिमित्त अकोले शहरात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य मिरवणूक व जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाची संपूर्ण तयारी पूर्ण झाली आहे, अशी माहिती शिवसेना नेते मारुती मेंगाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जगनशेठ देशमुख, शिवाजी पाटोळे, आनंद गिरे, चंद्रकांत गोंदके, राजाराम लहामगे, नामदेव मध्ये, दीपक पचवे, तुकाराम मेंगाळ यांच्यासह शिवसेना व आदिवासी समाजाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

मारुती मेंगाळ म्हणाले की, जागतिक आदिवासी दिन हा आदिवासी समाजाचा सर्वात मोठा सांस्कृतिक उत्सव असून या दिवशी समाजाची कला, संस्कृती, परंपरा आणि इतिहास जपण्याचा संकल्प केला जातो. आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे, क्रांतिकारक राया ठाकर, भगवान बिरसा मुंडा, वीर एकलव्य यांसारख्या महापुरुषांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांचा जागर केला जातो. राघोजी भांगरे आणि राया ठाकर यांच्या जन्मभूमीत हा सोहळा होत असल्यामुळे अकोलेच्या कार्यक्रमाला राज्यात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

ते पुढे म्हणाले की, गेल्या म हिनाभरापासून संपूर्ण अकोले विधानसभा मतदारसंघात गावागावांत बैठका घेऊन कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. डॉ. जालिंदर भोर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, मागील वर्षीप्रमाणे यंदाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली होती. त्यांनी ती मान्य केली असून, यंदाही ते कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

मागील वर्षीच्या कार्यक्रमात आदिवासी समाजाच्या विविध मागण्या मांडण्यात आल्या होत्या. त्यामध्ये आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या स्मारकाला आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याची तसेच क्रांतिकारक राया ठाकर यांच्या स्मारकाची उभारणी करण्याची मागणी करण्यात आली होती. शिंदे यांच्या पुढाकारातून पर्यटन विकास विभागामार्फत या दोन्ही स्मारकांसाठी सुमारे १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे मेंगाळ यांनी सांगितले. लवकरच या कामांना सुरुवात होणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

माळीन आणि इरशाळवाडी दुर्घटनांचा संदर्भ देत त्यांनी माळुंगी गावातील संभाव्य दरडग्रस्त भागातील नागरिकांच्या पुनर्वसनाचा मुद्दाही मांडला. मागील वर्षी शिंदे यांच्याकडे ही मागणी करण्यात आली होती. त्यानंतर पुनर्वसनासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाली असून, खाजगी जमिनीचा प्रस्ताव मंत्रालयात दाखल झाला आहे. लवकरच हा प्रश्नही मार्गी लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यात धनगर व आदिवासी समाजामध्ये आरक्षणाच्या मुद्द्यावर निर्माण होणारा संघर्ष थांबविण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मागील वर्षी जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमात राज्यघटनेने दिलेल्या आरक्षणात कोणताही बदल होणार नसल्याचे स्पष्टपणे जाहीर केल्याचेही मेंगाळ यांनी सांगितले. त्यामुळे गेल्या वर्षभरात हा विषय शांत राहिल्याचे त्यांनी नमूद केले.

अकोले तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी शिंदे यांच्या माध्यमातून विविध विभागांतील विकासकामांना गती मिळत असल्याचे सांगत मेंगाळ म्हणाले की, मागील वर्षी नगरपंचायतीसाठी सुमारे १३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला.

यंदाही नगरपंचायत तसेच तालुक्यातील विविध गावांसाठी नवीन विकासनिधी आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. आढाळा, प्रवरा, मुळा, चाळीसगाव डांगण आणि पठार भागातील विविध विकासकामांना गती देण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, ९ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्यमंत्री योगेश कदम अकोले येथे दाखल होतील. तहसील कार्यालयासमोरील पोलीस मैदानातून भव्य मिरवणुकीला प्रारंभ होईल. महात्मा फुले चौक मार्गे ही मिरवणूक बसस्थानक परिसरात पोहोचेल. दुपारी ३ ते ५ या वेळेत भव्य जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. यावर्षी वाहतुकीची कोंडी आणि ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तालुक्यातील सुमारे ११५ ते १२० गावांमध्ये स्वतंत्रपणे डीजे व बेंजोच्या माध्यमातून स्थानिक मिरवणुका होतील. मात्र हे डीजे अकोले शहरात येणार नसून शहरातील मुख्य मिरवणुकीत केवळ ब्रास बँडचा वापर केला जाणार आहे.

त्यामुळे शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने कार्यक्रम पार पडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला शिर्डी लोकसभा म तदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी खासदार सदाशिव लोखंडे, राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे, संगमनेरचे आम दार अमोल खताळ, नेवासाचे आमदार विठ्ठल लंगे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कम लाकर कोते, नितीन अवताडे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

मागील वर्षी कार्यक्रमानंतर झालेल्या किरकोळ गोंधळाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आयोजक आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त बैठक घेतली असून, शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात आली



आहे. अकोले पोलीस ठाण्याचे अधिकारी, दोन्ही मिरवणुकांचे आयोजक आणि संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधण्यात आला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शेवटी अकोले विधानसभा मतदारसंघातील सर्व नागरिक, आदिवासी बांधव आणि बहुजन समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन मारुती मेंगाळ यांनी केले. यंदाचा जागतिक आदिवासी दिन हा अकोलेच्या इतिहासातील सर्वात भव्य सोहळा ठरेल. अकोले शहराला जत्रेचे स्वरूप प्राप्त होईल आणि आदिवासी समाजाचा उत्सव जल्लोषात साजरा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आनंदऋषीजी हॉस्पीटल हे रुग्णांकरीता एक वरदान : उदयोजक अजित बोथरा

दंतरोग तपासणी व उपचार शिबारात २७० रुग्णांची तपासणी



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

सातत्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल गरीब – गरजू रुग्णांकरीता मोफत शिबीरे घेतात, त्यामुळे रुग्णांकरीता हे एक वरदान ठरत असून ही समाजाच्या दृष्टीने एक चांगली बाब आहे. समाजातील दु:ख निवारण्याचे काम जैन सोशल फेडरेशनच्या माध्यम ातून हॉस्पिटलच्यावतीने होत आहे. बोथरा परिवाराचा हॉस्पिटलच्या स्थापनेपासून सहभाग आहे आरोग्याच्या या कार्यात बोथरा परिवार सहभागी असल्याचा मनस्वी आनंद होत आहे.या कार्याची व्याप्ती आणखी वाढून त्याचा जास्तीत जास्त गरजूंना लाभ व्हावा, यासाठी हॉस्पिटलने आता यापुढेही अशीच सेवा सुरु ठेवावी, असे प्रतिपादन उद्योजक अजित बोथरा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित श्री आनंद ऋषीजी हॉस्पिटल अँड हार्ड सर्जरी सेंटर मध्ये राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त स्व. लखमीचंदजी बोथरा व स्व. सुशीलाबाई बोथरा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बोथरा परिवाराच्या वतीने आयोजित दंतरोग तपासणी व उपचार शिबिराचे उद्घाटन बोथरा परीवाराच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उद्योजक अजित बोथरा, सौ. प्रतिभा बोथरा, अमन बोथरा, सौ.आकांक्षा बोथरा, सतिश बोथरा,सौ. पूर्वा कोठारी, चि.जैवीक कोठारी, संतोष बोथरा, म ाणकचंद कटारीया, सतीश लोढा,सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, डॉ. अर्पणा पवार, डॉ. स्वराज ढोले, डॉ. अश्विनी बालगुडे, डॉ. तृप्ती डुंगरवाल, डॉ. प्रणव डुंगरवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

आकांक्षा बोथरा म्हणाल्या रुग्णसेवा हा एक यज्ञ असून तो सातत्याने चालविणे अवघड काम आहे.

हे अवघड शिवधनुष्य पेलण्याचे काम जैन सोशल फेडरेशनचे सर्व पदाधिकारी आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने करत आहे हे गौरवास्पद बाब आहे. समाजातील प्रत्येक घटकाला योग्य ती सेवा दिली जात आहे जे कार्य केले जाते पूर्ण श्रध्देने व निष्ठेने केले जात आहे. या कार्यात बोथरा परिवाराची पिढी सहभागी होत असल्याने सुख –समाधान – शांती लाभत असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, हे सामाजिक कार्य अजून जोमाने करण्याचा मानस आहे. साम जिक बांधिलकीच्या माध्यम ातून अत्याधुनिक मशिनरी व तज्ञ डॉक्टरांमार्फत कमी दरात रुग्णांना सेवा देण्याचा सातत्याने प्रयत्न हॉस्पिटलच्यावतीने सुरु असल्याचे सांगितले. बोथरा परिवार सारखे दानशूर व्यक्तीमुळेच हे शक्य झाले आहे आरोग्याच्या या यज्ञात बोथरा परिवार पुढची पिढी सहभागी झाली आहे.

डॉ. अर्पणा पवार म्हणाल्या दंतरोगात वेळेत उपचार घेणे गरजेचे आहे पुढे होणारे धोके त्यामुळे कमी होतात शिबिराच्या माध्यमातून अल्पदरात उपचार होणार आहेत अनेक प्रकारचे आधुनिक मशिनरी, सुपरस्पेशालिस्ट डॉक्टर यात सहभागी असल्याने तुमची योग्य ती काळजी घेतली जाते.

सुत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. सतीश लोढा यांनी आभार मानले.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाचा कार्यअहवाल मोहटादेवीच्या चरणी अर्पण

पाथर्डी (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी गेल्या तीन वर्षांच्या कार्यकाळात आयोगाच्या माध्यमातून केलेल्या विविध कार्याचा आढावा घेणारा कार्यअहवाल तयार केला आहे. हा कार्यअहवाल त्यांनी आपल्या श्रद्धास्थानी असलेल्या आई जगदंबा मोहटादेवीच्या चरणी म नोभावे अर्पण केला.

शेखर मुंदडा हे आई जगदंबा मोहटादेवीचे निस्सीम भक्त असून, नवीन वाटचालीला सुरुवात करताना मातेचे आशीर्वाद व ऊर्जा सदैव सोबत असावी, या भावनेतून त्यांनी हा कार्यअहवाल मोहटादेवीच्या चरणी अर्पण करण्याची इच्छा व्यक्त केली. मातृत्वाचे स्वरूप असलेल्या गोमातेची सेवा हीदेखील एक प्रकारची भक्ती व पूजा आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

या अनुषंगाने प्रातिनिधिक स्वरूपात मा. विश्वस्त डॉ. ज्ञानेश्वर दराडे यांच्या हस्ते आज मोहटादेवी येथे मंत्रोच्चाराच्या वातावरणात महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या कार्यअहवालाचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी गोसेवा, संस्कृती आणि समाजहिताच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी मोहटादेवी देवस्थानचे विश्वस्त अशोक दहिफळे, अहिल्यानगर बार असोसिएशनचे संचालक ड. आजिनाथ कर्डिले, सोहम दराडे, ब्रह्मवृंद बाळासाहेब क्षीरसागर, भास्कर देशपांडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

महिलांच्या मागणीला आमदार दातेंचा तातडीचा प्रतिसाद!

अवघ्या आठ दिवसांत 'कासारे ते वाघदरा रस्ता' कामाला सुरुवात

पारनेर (समर्थ गांवकरी)

शनिवार दि. ८ ऑगस्ट २०२६ कासारे ते वाघदरा, वाफारेवाडी शिवरस्ता खडीकरण व मजबुतीकरण करण्याच्या महत्त्वपूर्ण कामाचा शुभारंभ आ. काशिनाथ दाते सर यांचे शुभहस्ते पार पडला. आठ दिवसांपूर्वी वाघदरा–कासारे परिसरातील पंधरा ते विस महिला भगिनींनी पारनेर येथे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या जनसंपर्क कार्यालयात त्यांची भेट घेऊन या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. महिलांनी मांडलेल्या या प्रश्नाची तातडीने दखल घेत आमदार दाते सरांनी संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा केला आणि अवघ्या आठ दिवसांत 'मौजे कासारे येथील कासारे ते वाघदरा ते वाफारेवाडी शिवरस्ता खडीकरण व मजबुतीकरण



करणे' या कामाचा प्रत्यक्ष शुभारंभ झाला.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, काही दिवसांपूर्वी वाघदरा परिसरातील महिला माझ्याकडे या रस्त्याच्या अडचणी घेऊन आल्या होत्या. त्यांनी मांडलेल्या प्रश्नाची तातडीने दखल घेत संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला. त्यामुळे आज अवघ्या आठ दिवसांत या रस्त्याच्या खडीकरण व मजबुतीकरणाच्या कामाचा शुभारंभ होत आहे. नागरिकांनी विश्वासाने आपले प्रश्न माझ्याकडे मांडावेत; ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे, असे त्यांनी सांगितले.

नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशन, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन व पारनेर तालुका पतसंस्था फेडरेशनचा उपक्रम

पारनेर तालुक्यातील पतसंस्थांचे एक दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

पतसंस्थांच्या ठेवींना राज्य सरकारकडून संरक्षण मिळाल्यास पतसंस्थांवरील विश्वास वाढेल व पतसंस्था चळवळीला मोठे बळ मिळेल-आमदार काशिनाथ दाते

अहिल्यानगर –पतसंस्थांची चळवळ ही ग्रामीण भागातील आहे. गरजू लोकांना मदत करण्याचे काम पतसंस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात होत आहे. दुष्काळी तालुका असून देखील नोकरी,धंदा व व्यवसाय करण्याच्या उद्देशाने बाहेर पडलेले पारनेर येथील रहिवासी पतसंस्थांना बचतीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात ठेवी देऊन बळ देण्याचे काम करत असतात.

साखर कारखान्यांना अडचण आल्यास राज्य सरकारकडून मदत दिली जाते.परंतु एखादी पतसंस्था अडचणीत आली तर सहकार खात्याकडून कोणत्याही प्रकारचे संरक्षण दिले जात नाही. ही मोठी खंत आहे.पतसंस्थांच्या माध्यमातून सहकार खात्याला वेगवेगळ्या प्रकारचा महसूल जमा केला जातो.पतसंस्थांना राज्य सरकारकडून संरक्षण मिळणे गरजेचे आहे. पतसंस्थांच्या ठेवींना राज्य सरकारकडून संरक्षण मिळाल्यास पतसंस्थांवरील विश्वास वाढेल व पतसंस्था चळवळीला मोठे बळ मिळेल.असे प्रतिपादन पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी केले आहे.

नाशिक विभागीय नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था फेडरेशन आयोजित महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन,पारनेर तालुका पतसंस्था फेडरेशन जिल्हा उपनिबंधक कार्यालय सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर तालुक्यातील पतसंस्थांच्या

एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.याप्रसंगी विशाल दाते(सहाय्यक निबंधक, सहकारी संख्या ता.पारनेर),प्रमुख मार्गदर्शक:महाराष्ट्र टाज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे कार्यकारी अध्यक्ष काकासाहेब कोयटे,माजी सहनिबंधक तानाजी कवडे,महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संचालक भास्कर बांगर,नाशिक विभागीय नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी



पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा,नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष वसंतराव कवाद,पारनेर तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष शिवाजी मोरे, पुणे जिल्हा महात्मा फुले ग्रामीण पतसंस्थेचे सोपान भाकरे, निघोज ग्रामीण पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, मराठा पतसंस्थेचे उपाध्यक्ष उदय अनभूले आदी उपस्थित होते. आमदार काशिनाथ दाते पुढे म्हणाले, पतसंस्थांच्या प्रशिक्षण कार्यशाळेच्या माध्यमातून पतसंस्थांचे व्यवस्थापन सुधारण्यास मदत होईल. पतसंस्था चळवळीत काही अपप्रवृत्तीने राजकारण आणण्याचा प्रयत्न केला आहे त्याचा फटका अनेक पतसंस्थांना बसला आहे. पतसंस्था चळवळीत काहीही संबंध नसणाऱ्या लोकांनी पतसंस्था बुडीत कसे निघतील.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय
५ बी.जे.रोड, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, पुणे ४११००१
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये
दूरध्वनी : ०२०–२६१२५७७९ ईमेल : ddrpunegramin@gmail.com

जाहिर नोटीस

अर्ज क्र. १०/२०२६–२७ **दि. ०५/०८/२२६/२०४८**

(नियोजित) न्यु श्रीराम शॉपिंग सेंटर को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.
पत्ता– स.नं. १७७/२०/ब, पैकी, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे. ४१०५०३
तर्फे मुख्यप्रवर्तक श्री. विलास चंद्रकांत मोरडे **.....अर्जदार**
विरुद्ध..... श्रीमती. जयश्री दत्तात्रय मोरडे (विकासक/जागा मालक)
पत्ता– रा. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे–४१०५०३

वरील नमूद अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने वरील नमूद मुख्य प्रवर्तक यांनी संस्थेच्या नोंदणीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर नियोजित संस्थेच्या नोंदणी प्रस्तावाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १७/०८/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे १ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून पुढील निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ठिकाण – पुणे **(प्रकाश ल. जगताप)**
दि. ०५/०८/२०२६ **सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, पुणे. (ग्रामीण)

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
दूरध्वनी : ०२०–२६१२५७७९ ईमेल : ddrpunegramin@gmail.com

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक. २३/२०२६–२७
पुणे, दिनांक: ०५/०८/२०२६/२०४७

संकल्प सहकारी गृहरचना संस्था मर्या. (अध्यक्ष)
सि.स.नं.७०६ अ व ७०६ ब, वरलीआळी, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे.
४१०५०२. तर्फे अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत बाळासाहेब सावंत **... अर्जदार**
विरुद्ध.....मे. संकल्प कंस्ट्रक्शन्स तर्फे प्रोप्रा.
स्व. जितेंद्र यशवंत उदास (विकासक/जागा मालक) यांचे
कायदेशीर वारस श्रीमती. उज्वला यशवंत उदास, रा. वरली आळी,
जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०२ **...जाबदेणार**

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होण्यासाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १७/०८/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५ बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक ०५/०८/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

(प्रकाश ल. जगताप)
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे. (ग्रामीण)

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
दूरध्वनी : ०२०–२६१२५७७९ ईमेल : ddrpunegramin@gmail.com

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक. २२/२०२६–२७
पुणे, दिनांक: ०५/०८/२०२६/२०४६

श्रीनिवास हाईट्स् सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.
स.नं. ३२०/५, नारायणगाव, (शेवंताई पेट्रोल पंपासमोर), ता. जुन्नर,
जि. पुणे. ४१०५०४. तर्फे सचिव श्री. दत्तात्रय काशिनाथ बोऱ्हाडे **.... अर्जदार**
विरुद्ध.....मे. श्रीनिवास असोसिएट्स् तर्फे प्रोप्रा/भागीदार/जागा मालक.
१) श्री. अमरकुमार विजयकुमार गांधी २) श्री. उत्तमचंद देवीचंद शेलोत
३) जयहिंद ट्रेडिंग कं. तर्फे संचालक श्री. विजय महादेव गुंजाळ सर्व रा. नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०४. ४) श्री. ज्ञानेश्वर रावजी खंडागळे, रा. मांजरवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०४ **... जाबदेणार**

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप क्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होण्यासाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १७/०८/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक ०५/०८/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

(प्रकाश ल. जगताप)
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे. (ग्रामीण)

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

थोडक्यात पण महत्वाचे

मुकुंदनगरमध्ये पालिका कर्मचाऱ्यावर प्राणघातक हल्ला

आ.संग्राम जगताप यांच्याकडून घटनेचा निषेध व कारवाईची मागणी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर शहराचे उपनगर मुकुंदनगर परिसरात पथदिव्यांच्या दुरुस्तीचे सार्वजनिक काम करत असताना महानगरपालिकेचे कर्मचारी धीरजसिंग परदेशी यांना काही जणांकडून मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडल्याने संपूर्ण शहरात एकच खळबळ उडाली आहे. या मारहाणीत

परदेशी गंभीर जखमी झाले असून खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच आमदार संग्राम जगताप आणि पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रुग्णालयात जाऊन परदेशी यांच्या प्रकृतीची चौकशी केली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक रवाना झाले आहे. दरम्यान, सार्वजनिक सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर होणारे असे हल्ले निंदनीय असून, पोलिसांनी यापूर्वीच्या घटनांचे गांभीर्य ओळखून अशा जिहादी प्रवृत्तीच्या आरोपींना लवकरात लवकर अटक करावी आणि अशा प्रवृत्तींना आळा घालावा अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांनी माध्यम ांशी बोलताना केली.

जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी अफवांवर विश्वास न ठेवता पोलिस तपास कार्यात सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे

म्हैसवळण घाट मार्गे अकोले-कसारा एसटी बस सेवा १७ ऑगस्टपासून पुन्हा सुरू




एकदरे (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील म्हैसवळण घाट मार्गे धावणारी अकोले-कसारा एसटी बस सेवा गेल्या अनेक दिवसांपासून बंद होती.ही बस सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी चंदगिरवाडीचे युवा उद्योजक नामदेव घोरपडे तसेच ड.सिध्देश्वर लांघी तसेच एकदरे चंदगिरवाडीचे ग्रामस्थ यांचा सहकार्याने अकोले आगाराचे आगारप्रमुख सुरेश दराडे यांची भेट घेऊन अकोले-देवठाण-केळी-सांगवी-म्हैसवळण घाट मार्गे कसारा एसटी बस सेवा सुरू करण्याबाबत निवेदन देण्यात आले.या निवेदनाची तत्काळ दखल घेत आगारप्रमुखांनी १७ ऑगस्ट २०२६ पासून बस सेवा पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले.या बस सेवेमुळे परिसरातील गावांतील नागरिकांना सुलभ, सुरक्षित आणि वेळेवर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असून दळणवळणाचा महत्त्वाचा प्रश्नही मार्गी लागणार आहे.तसेच या बस सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यास याच मार्गावर आणखी एक बस सुरू करण्याचाही सकारात्मक विचार करण्यात येईल,असे आगारप्रमुख सुरेश दराडे यांनी सांगितले. मुंबईकडे नोकरी,व्यवसाय व इतर कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी ही बस सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याने परिसरातील नागरिकांनी या सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले. यावेळी सुरेश बो-हाडे,ड. सिद्धेश्वर लांघी, नामदेव घोरपडे,चंदगीरवाडीचे सरपंच यशवंता बेंडकोळी,नामदेव साबळे,बाळू आव्हाड तसेच परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

शिक्षणाधिकाऱ्यांची शाळेला सदिच्छा भेट

शिक्षकांना शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी मार्गदर्शन



पाथर्डी (समर्थ गांवकरी)

माणिकदौंडी येथील श्री रत्न जैन विद्यालय शाळेला मा.गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड यांनी सदिच्छा भेट देऊन शाळेच्या शैक्षणिक कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांनी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधून विविध शैक्षणिक बाबींवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांम ध्ये सर्जनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, नैतिक मूल्ये आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन गटशिक्षणाधिकाऱ्यांनी केले. स्पर्धा परीक्षा तयारी, आदर्श परीपाठ, माजी विद्यार्थी व लोकसहभाग, डिजिटल साधनांचा वापर तसेच बदलत्या शैक्षणिक प्रवाहानुसार अध्यापनाच्या नाविन्यपूर्ण पद्धतींचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. विद्यालयातील मुख्याध्यापकांकडून नवोदय, एन एम एम एस, शिष्यवृत्ती परीक्षा, सूप्त कलागुणांना वाव देण्यासाठी चित्रकला परीक्षा, विविध उपक्रम, शैक्षणिक प्रगती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रम ांची माहिती तसेच या शाळेतील विद्यार्थी दरवर्षी नवोदय परीक्षेत यश संपादन करतात, याची माहिती गटशिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यांनी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करून भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

अवैध दारूविरोधी वृत्ताने खळबळ

पत्रकार संजय गायकर यांना जीवे मारण्याची धमकी!

अकोले (समर्थ गांवकरी)

ब्राम्हणवाडा परिसरातील अवैध दारू विक्रीविरोधात वृत्त प्रसिद्ध केल्याच्या कारणावरून पत्रकार संजय गायकर यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधितांवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, तसेच ब्राम्हणवाडा परिसरातील अवैध दारू विक्रीची सखोल चौकशी करून संबंधितांवर तडीपारीचे प्रस्ताव दाखल करावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पोलिसांकडे निवेदनाद्वारे केली.

दि. ८ ऑगस्ट रोजी दुपारी ब्राम्हणवाडा येथे अवैध दारू विक्रीप्रकरणी कारवाई सुरू असताना पत्रकार संजय गायकर घटनास्थळी गेले होते. त्यावेळी संकेत लहू शिंदे याने शिवीगाळ करून धमकी दिल्याचा, तर त्यानंतर आनंदा रखमा शिंदे यानेही शिवीगाळ करत अंगावर धावून जाऊन जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. यावेळी राज्य उत्पादन शुल्क विभाग शाखेचे अधिकारी-कर्मचारी तसेच गावचे पोलीस पाटील उपस्थित असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेऊन पत्रकारांच्या सुरक्षिततेचा मुद्दा उपस्थित केला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ यांच्या वतीने डी.वाय.एस.पी. यांच्याकडे निवेदन; दोषींवर कठोर कारवाईसह तडीपार प्रस्ताव दाखल करण्याची मागणी!

यावेळी जिल्हा पोलीस उपाध्यक्ष कुणाल सोनवणे यांनी शिष्टमंडळाशी संवाद साधताना, पत्रकारांना धमकावण्याचे प्रकार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाहीत, असे स्पष्ट केले. अशा प्रकारे धमकी देणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून, ब्राम्हणवाडा गावातील अवैध दारू विक्री करणाऱ्यांचा बंदोबस्त करण्याबरोबरच त्यांच्याविरोधात तडीपारीचे प्रस्तावही तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पोलीस निरीक्षक संदीप कोळी, पोलीस हवालदार सुहास गोरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, तालुका





सचिव हरिभाऊ फापाळे यांच्यासह पत्रकार संघाचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. पत्रकार संजय गायकर यांच्या जीवितास संरक्षण देऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केली आहे. कारवाई न झाल्यास दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी अकोले पोलीस ठाण्यासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, आमदार डॉ. किरण लहामटे, दारूबंदी चळवळीचे प्रणेते प्रा. हेरंब कुलकर्णी आणि विभागीय पोलीस अधिकारी सोमनाथ वाकचौरे यांना देण्यात आल्या आहेत.

आनंदगड संकुलात जागतिक आदिवासी दिन उत्सहात साजरा

अकोले (समर्थ गांवकरी)



तालुक्यातील वीरगाव येथील आंतरभारती रूरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित आनंदगड शैक्षणिक संकुल व धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मि डीयम स्कूल न्ड जुनियर कॉलेज मध्ये जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे होते.

यावेळी आदिवासी क्रांतीकारक भगवान बिरसा मुंडा, राघोजी भांगरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संकुलाचे सचिव अनिल रहाणे, संचालिका सुप्रिया वाकचौरे, संचालिका गीता रहाणे, शिवराज वाकचौरे, प्राचार्य किरण चौधरी, अधीक्षक रवींद्र आंबरे, कॅम्पस डायरेक्टर संदिप थोरात, सुपरवायझर सौ अलका आहेर, पिंगला तोरमल लक्ष्मण कवडे, देविदास चारुडे, अधिक्षिका सिमा दिघे यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी श्रुतीअरगडे, वेदांती चव्हाण, विहान सहाणे, हर्षदा धूम, रुग्वेद चव्हाण, अद्विक तरडे, खुशी रोडे, योगिनी गायकवाड या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत आदिवासी समाजाचा इतिहास व क्रांतिकारकांच्या शौर्याच्या गाथा विद्यार्थ्यांसमोर मांडल्या.

विद्यार्थ्यांनी विविध आदिवासी नृत्य सादर करत आदिवासी संस्कृतीचा आगळा-वेगळा अनुभव दिला. संकुलाच्या वतीने भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक आरोही बिडगर हिने तर सुत्रसंचलन स्वरा चव्हाण व प्रचिती लांडगे यांनी केले.

आभार राजवीर देशमुख याने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

किल्ले शिवनेरी तुळजाभवानी संस्कृती कला केंद्र कांदळी येथे बंदुकीतली गोळी लागून एक गंभीर जखमी

कोळेकर ,आण्णा, चिनु व अनोळखी व्यक्ती आरोपी फरारी

शिवनेरी (समर्थ गांवकरी)

किल्ले शिवनेरी शिवजन्मभूमी मध्ये तुळजाभवानी सांस्कृतिक कला केंद्र कांदळी येथे पहाटे बारी लावण्याच्या कारणावरून (पिस्टल) बंदुकीतील गोळी लागुन एक जण गंभीर जखमी झाला आहे . कोळेकर,आण्णा , चिनु व अनोळखी व्यक्ती असे चार फरारी फरारी आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की , अक्षय अनिल धोंगडे, वय ३८ वर्षे, काम कलाकेंद्र व्यवसाय, सध्या रा. वारुळवाडी, आनंदवाडी, दत्ता हाईटस् सोसायटी , दुसरा मजला रूम नं २०२, ता. जुन्नर ह्या व्यक्तीने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली की , शनिवार ,दि. ८ रोजी पहाटे ४ . ३० ते ४.५० वा.चे दरम्यान आण्णा व चिनु व त्याचे सोबत असणा-या एक अनोळखी इसमानी तुळजाभवानी संस्कृती कलाकेंद्र, कांदळी, ता. जुन्नर येथे पुणे येथे कार्यक्रमाची बारी लावण्याचे कारणावरून बारी मालकीण व आमच्याशी वाद सुरू झाला .

तिसरी बारी न लावल्याने बारी मालकीण मनिषा, मला व आमचे कामगारांना शिवीगाळ दमदाटी सुरू



झाली. आम्हाला धक्काबुक्की करून, हाताने मारहाण केली . आम्हाला जिवे मारण्याच्या उद्देशाने त्या चार इसमांपैकी एकाने त्याच्या जवळील (पिस्टल) बंदूक काढून माझ्या वर रोखत, मारू का? मारू का? असे म्हणत (पिस्टल) बंदूक मधुन फायर करून मला जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

त्यावेळी मी बाजुला सरकलो म्हणून मला गोळी लागली नाही, परंतु त्यावेळी तेथे जमलेल्या इसमांपैकी फिरोज कादीर शेख, रा. ओतुर, भोईगल्ली, ता. जुन्नर या व्यक्तीला गोळी लागुन गंभीर जखमी झाला आहे.

कळवण तालुका म्हणजे खड्ड्यांचा तालुका!

- **जिकडे जाल तिकडे खड्डे! झथऊ झोपले, जनता भोगतेय**
- **निधी कोट्यवधीचा, रस्ते ६ महिन्याचे! कळवणच्या रस्त्यांवरून जनतेचा संताप**
- **टक्केवारीसाठी निकृष्ट काम, निधीचा गैरवापर - काँग्रेस अध्यक्ष के.के. गांगुर्डे यांचा गंभीर आरोप**

कनाशी (समर्थ गांवकरी)



कळवण तालुक्यातील चौफेर रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. जिकडे पहावे तिकडे फक्त खड्डेच खड्डे . लोकप्रतिनिधींनी रस्त्याबाबत विचार करण्याची गरज बोगस रस्त्यामुळे सर्वसामान्य जनता आणि वाहनधारकांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. तालुक्यातील रस्त्यांच्या अवस्थेमुळे नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, आता तरी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी जागे होणार का? असा सवाल उपस्थित केला आहे.

कोट्यवधींचा निधी, रस्ते मात्र ६ महिन्याचे!

काँग्रेसचे तालुका अध्यक्ष के.के. गांगुर्डे यांनी यावर संतापजनक प्रतिक्रिया दिली आहे.

वर्षभरात रस्ते बनतात पण क्वालिटी शून्य! राज्य सरकार रस्त्यांसाठी कोट्यवधींचा निधी देत आहे. मात्र तो निधी कुठे जातोय हेच कळत नाही. टक्केवारीच्या भ्रष्टाचारामुळे निकृष्ट दर्जाचे काम होते. त्यामुळेच वेरूळे सारखे अपघात होऊन निष्पापांचे बळी जात आहेत. याला जबाबदार कोण? लोकप्रतिनिधी की झथऊ? जनतेच्या मनात आता मनस्ताप निर्माण झाला आहे कोल्हापूर फाटा -अभोना रोड पूर्णपणे उखडला आहे. वाहन चालवणे म्हणजे जीवाशी खेळ.

नाकोडे ते इंगळवाडी, ढेकाळे रोकोडोबा फाटा हा संपूर्ण रस्ता अपघाताचा सापळा बनला आहे. मोठे खड्डे आणि चिखल.

कळवनच्या खेडेगावात कुठेही जा फक्त खड्डेच खड्डे खड्डे. वाहनांचे टायर फुटणे, अपघात होणे ही आता नित्याची बाब झाली आहे. शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण यांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे.

ठाणे जिल्ह्यात 'सर्वकष प्राथमिक आरोग्य सेवा प्रशिक्षण कार्यक्रमाला' वेग

१० प्रशिक्षण सत्रांत ३७८ अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण; उर्वरित आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचे काम सुरू

ठाणे (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'सर्वकष प्राथमिक आरोग्य सेवा (Comprehensive Primary Health Care - CPHC) प्रशिक्षण कार्यक्रमाची ठाणे जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, आतापर्यंत १० प्रशिक्षण सत्रे पूर्ण झाली आहेत. या सत्रांमध्ये एकूण ३७८ अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, उर्वरित कर्मचाऱ्यांसाठी नियोजित प्रशिक्षण सत्रे टप्प्याटप्प्याने सुरू आहेत.

आयुष्मान भारत योजनेअंतर्गत कार्यरत आयुष्मान आरोग्य मंदिरांम धील प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने हा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यादव यांची वज्रेश्वरी व अनगाव आरोग्य केंद्रांना भेट

पंचायत समिती भिवंडी येथे आरोग्य सेवा, SLWM Rules-2026 व घरकुल योजनांच्या कामांचा घेतला आढावा

ठाणे (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दि. ०६ ऑगस्ट २०२६ रोजी वज्रेश्वरी व अनगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामपंचायत वज्रेश्वरी तसेच पंचायत समि ती भिवंडी येथे भेट देऊन विविध विकासकामे व शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. यावेळी आरोग्य सेवा, ग्रामपंचायतस्तरीय काम काज, प्रादेशिक पाणीपुरवठा योजना, ड्डथच् र्ठीश्रशी-२०२६ तसेच घरकुल योजनांच्या प्रगतीबाबत संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सर्वप्रथम प्राथमिक आरोग्य केंद्र, वज्रेश्वरी येथे भेट देऊन बाह्यरुग्ण विभाग, प्रयोगशाळा, औषध भांडार, लसीकरण कक्ष, प्रसूती कक्ष आदी विविध विभागांची पाहणी केली. यावेळी रुग्णांना देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा, औषधांचा उपलब्ध साठा, कर्मचारी उपस्थिती तसेच आरोग्य केंद्रातील स्वच्छतेचा आढावा घेण्यात आला. नागरिकांना वेळेत व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य केंद्रातील सर्व सुविधा कार्यक्षम ठेवण्याच्या सूचना त्यांनी संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

यानंतर ग्रामपंचायत वज्रेश्वरी येथे भेट देऊन ग्रामपंचायतीच्या विविध दप्तरांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची पूर्तता करून दप्तर अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच वज्रेश्वरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेण्यात आला. योजनेची प्रभावी अंमलबजावणी तसेच पाणीपट्टी वसुली वाढविण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या.

वज्रेश्वरी हे प्रसिद्ध पर्यटनस्थळ असल्याने परिसरातील स्वच्छता व कचरा व्यवस्थापनाला विशेष महत्त्व देण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी SLWM² Rules-2026 ची प्रभावी अंमलबजावणी करून घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची योग्य व्यवस्था निर्माण करण्याचे निर्देश देण्यात आले. ग्राम पंचायतीचे सरपंच व पदाधिकारी यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करून स्थानिक पातळीवरील समस्या व विकासकामांचा आढावाही घेण्यात आला.

त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, अनगाव येथे भेट देऊन सुरू असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाची पाहणी केली. बांधकामाच्या सद्यस्थितीचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाची माहिती घेण्यात आली. नवीन इमारतीचे काम लवकरात लवकर पूर्ण करून आवश्यक कार्यवाहीनंतर इमारत हस्तांतरित करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागाला दिल्या. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सध्याच्या कार्यप्रणालीचाही त्यांनी आढावा घेतला.

त्यानंतर पंचायत समिती, भिवंडी येथे तालुकास्तरीय विभागप्रमुख तसेच



ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. यावेळी ड्डथच् र्ठीश्रशी-२०२६ ची काटेकोर अंमलबजावणी करण्यावर विशेष भर देण्यात आला. गावांमध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची प्रभावी व्यवस्था निर्माण करून स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीत घरकुल योजनांतील अपूर्ण बांधकामांचाही आढावा घेण्यात आला. अपूर्ण घरकुलांची कामे तत्काळ पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच VB-GRMG योजनेअंतर्गत कोणताही पात्र घरकुल लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दिले. शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचण्यासाठी विभागीय समन्वयातून कामकाज करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

या भेटी व आढावा बैठकीस गटविकास अधिकारी गोविंद खामकर, सहायक गटविकास अधिकारी सुदाम इंगळे तसेच विविध विभागांचे विभागप्रम ुख, ग्रामपंचायत अधिकारी आणि संबंधित